आपल्या वातम्या, आतल्या बातम्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# सपकाळ इंजिनीअरिंग कॉलेजला सेंटर ऑफ एक्सलन्स

## बारामती येथील अटल सर्टिफाइड इनक्यूबेशन सेंटर सोबत सामंजस्य करार



✦ **नाशिक** । महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत सेंटर ऑफ एक्सलन्स मंजूर झाल्याबद्दल लेट जी. एन. सपकाळ इंजिनीअरिंग कॉलेजला निधी वितरण, शारदाबाई पवार महिला महाविद्यालय, बारामती येथे बारामती ग्रोच्या विश्वस्त सुनंदा पवार यांच्याहस्ते तसेच करिअर कट्टा राज्य समन्वयक, एमआयटीएससी अध्यक्ष, यशवंत शितोळे आणि बी.व्ही.जी. ग्रुप चे संस्थापक उद्योजक हनुमंतराव गायकवाड यांच्या उपस्थितीमध्ये निधीचा धनादेश कॉलेजचे प्राचार्य डॉ. साहेबराव बागल यांनी स्वीकारला. तसेच या कॉलेजमधील अटल सर्टिफाइड इनक्यूबेशन सेंटर सोबत सामंजस्य करार संपन्न झाला. करिअर कट्टा कॉलेज समन्वयक तसेच नाशिक जिल्हा समन्वयक प्रा. सीमा बाजी यांनी सेंटर ऑफ एक्सलन्स पूर्ततेसाठी संपूर्ण कामकाज पाहिले. महाराष्ट्र राज्यातील ३०० विद्यार्थ्यांसाठी पहिले आणि सर्वात मोठे विद्यार्थ्यांचे करिअर संसद अधिवेशन दि.११ व १२ जानेवारी २०२४ रोजी बारामती येथे पार पडले. याचे उद्घाटन युवा आमदार सत्यजित तांबे आणि बारामती ग्रो चे चेअरमन यांच्या हस्ते झाले. यामध्ये बँक अधिकारी, उद्योजक, प्रशासकीय अधिकारी, स्पर्धा परीक्षा तयारी करता विविध मान्यवरांनी मार्गदर्शन केले. त्यासोबत इनक्युबेशन सेंटर, विज्ञान केंद्र, कृषी केंद्र येथे फील्ड व्हिजीट आणि विद्यार्थी सादरीकरण इत्यादी चे आयोजन केले गेले होते. सपकाळ नॉलेज हब चे चेअरमन मा. डॉ. रविंद्र सपकाळ यांनी सपकाळ इंजिनीअरिंग कॉलेज चे अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. सेंटर ऑफ एक्सलन्स निधी चा वापर स्पर्धा परीक्षा अभ्यासिका केंद्र व उद्योजकता विकास केंद्र उभारणीसाठी होणार आहे.सपकाळ इंजिनीअरिंग कॉलेजमधील ५ विद्यार्थी आणि करिअर कट्टा सहसमन्वयक प्रा. किरण देवरे यांनी या अधिवेशनास उपस्थित राहून सर्व उपक्रमात सक्रियपणे सहभाग नोंदवला.

Nashik Edition
Jan 15, 2024 Page No. 7
Powered by : eReleGo.com

६ दैनिक लोकनामा | नाशिक, सोमवार, १५ जानेवारी २०२४
www.eloknama.com



# सपकाळ महाविद्यालय- अटल सर्टिफाइड सेंटरमध्ये करार

**लोकनामा प्रतिनिधी**

**नाशिक** : राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर कट्टा उपक्रम सुरू आहे. याअंतर्गत सेंटर ऑफ एक्सलन्स मंजूर झाल्याबद्दल लेट जी. एन. सपकाळ अभियांत्रिकी महाविद्यालयाला निधीचे वितरण झाले.

शारदाबाई पवार महिला महाविद्यालयात (बारामती) बारामती ॲग्रोच्या विश्वस्त सुनंदाताई पवार यांच्या हस्ते निधीचा धनादेश करिअर कट्टा राज्य समन्वयक, एमआयटीएससी अध्यक्ष यशवंत शितोळे व बीव्हीजी ग्रुपचे संस्थापक हणमंतराव गायकवाड यांच्या उपस्थितीत प्राचार्य डॉ. साहेबराव बागल यांनी स्वीकारला. या

महाविद्यालयामधील अटल सर्टिफाइड इन्क्युबेशन सेंटरसोबत सामंजस्य करार झाला. करिअर कट्टा कॉलेज समन्वयक, तसेच नाशिक जिल्हा समन्वयक प्रा. सीमा बाजी यांनी सेंटर ऑफ एक्सलन्स पूर्ततेसाठी कामकाज पाहिले.

राज्यातील तीनशे विद्यार्थ्यांसाठी पहिले आणि सर्वांत मोठे विद्यार्थ्यांचे करिअर संसद अधिवेशन ११ व १२ जानेवारी २०२४ ला बारामतीत झाले. त्याचे उद्घाटन आमदार सत्यजित तांबे, बारामती ॲग्रोचे चेअरमन यांच्या हस्ते झाले. यावेळी बँक अधिकारी, उद्योजक, प्रशासकीय अधिकाऱ्यांनी स्पर्धा परीक्षांच्या तयारीकरिता मार्गदर्शन केले. त्यासोबत इन्क्युबेशन सेंटर, विज्ञान केंद्र, कृषी केंद्र येथे भेट व सादरीकरण आदी आयोजित केले होते. सपकाळ नॉलेज हबचे चेअरमन डॉ. रवींद्र सपकाळ यांनी सपकाळ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे अभिनंदन केले. सेंटर ऑफ एक्सलन्स निधीचा वापर स्पर्धा परीक्षा अभ्यासिका केंद्र व उद्योजकता विकास केंद्र उभारणीसाठी होणार आहे. सपकाळ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे पाच विद्यार्थी आणि करिअर कट्टा सहसमन्वयक प्रा. किरण देवरे यांनी या अधिवेशनास उपस्थित राहून सर्व उपक्रमांत सहभाग नोंदवला.




**फोटो: सेंटर ऑफ एक्सलन्स निधीचा धनादेश स्वीकारताना कॉलेजचे प्राचार्य डॉ. साहेबराव बागल**

***सपकाळ इंजिनीअरिंग कॉलेजला सेंटर ऑफ एक्सलन्स निधी वितरण आणि बारामती येथील अटल सर्टिफाइड इनक्यूबेशन सेंटर सोबत सामंजस्य करार***

*महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत सेंटर ऑफ एक्सलन्स मंजूर झाल्याबद्दल लेट जी. एन. सपकाळ इंजिनीअरिंग कॉलेजला निधी वितरण, शारदाबाई पवार महिला महाविद्यालय, बारामती येथे बारामती ॲग्रो च्या विश्वस्त मा. सुनंदाताई पवार यांच्या हस्ते तसेच करिअर कट्टा राज्य समन्वयक, MITSC अध्यक्ष, यशवंत शितोळे आणि बी.व्ही.जी. ग्रुप चे संस्थापक उद्योजक हणमंतराव गायकवाड यांच्या उपस्थितीमध्ये निधीचा धनादेश कॉलेजचे प्राचार्य डॉ. साहेबराव बागल यांनी स्वीकारला. तसेच या कॉलेजमधील अटल सर्टिफाइड इनक्यूबेशन सेंटर सोबत सामंजस्य करार संपन्न झाला. करिअर कट्टा कॉलेज समन्वयक तसेच नाशिक जिल्हा समन्वयक प्रा. सीमा बाजी यांनी सेंटर ऑफ एक्सलन्स पूर्ततेसाठी संपूर्ण कामकाज पाहिले.*

*महाराष्ट्र राज्यातील ३०० विद्यार्थ्यांसाठी पहिले आणि सर्वात मोठे विद्यार्थ्यांचे करिअर संसद अधिवेशन दि.११ व १२ जानेवारी २०२४ रोजी बारामती येथे पार पडले. याचे उदघाटन युवा आमदार सत्यजित तांबे आणि बारामती ग्रो चे चेअरमन यांच्या हस्ते झाले. यामध्ये बँक अधिकारी, उद्योजक, प्रशासकीय अधिकारी, स्पर्धा परीक्षा तयारी करता विविध मान्यवरांनी मार्गदर्शन केले.*

*त्यासोबत इनक्युबेशन सेंटर, विज्ञान केंद्र, कृषी केंद्र येथे फील्ड व्हिजीट आणि विद्यार्थी सादरीकरण इत्यादी चे आयोजन केले गेले होते. सपकाळ नॉलेज हब चे चेअरमन मा. डॉ. रविंद्र सपकाळ यांनी सपकाळ इंजिनीअरिंग कॉलेज चे अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. सेंटर ऑफ एक्सलन्स निधी चा वापर स्पर्धा परीक्षा अभ्यासिका केंद्र व उद्योजकता विकास केंद्र उभारणीसाठी होणार आहे.*

*सपकाळ इंजिनीअरिंग कॉलेजमधील ५ विद्यार्थी आणि करिअर कट्टा सहसमन्वयक प्रा. किरण देवरे यांनी या अधिवेशनास उपस्थित राहून सर्व उपक्रमात सक्रियपणे सहभाग नोंदवला.*

लोकमत

महाविद्यालयीन विश्व म्हणजे नव उन्मेष फुलण्याचा, उत्तुंग स्वप्न पाहण्याचा व ती साकार करण्यासाठी ध्येयाच्या दिशेने वाटचाल करण्याचा, चैतन्याचा, कल्पकतेचा ओसंडून वाहणारा अविरत झरा आहे. याच काळात युवा वर्ग घडतो आणि बिघडतोही. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने आणि स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी महाविद्यालय पातळीवर 'करिअर कट्टा' हा उपक्रम राबविला जातो, ज्यातून प्रगल्भ विचारांची सक्षम पिढी घडविण्याचे कार्य सुरू आहे.



# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा 'करिअर कट्टा'

महाविद्यालयीन जीवन जगणाऱ्या प्रत्येकाला हमखास विचारला जाणारा प्रश्न म्हणजे 'पुढे कोण होणार?' हा अनंत काळ एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला विचारला जाणारा गहन प्रश्न. यातून पालकांच्या अपेक्षा आणि स्वप्नांच्या अवजड ओझ्याखाली 'युवा' वर्ग दबला जात आहे. प्रशासकीय क्षेत्रात प्रवेश करण्याच्या दिशेने वाटचाल करण्याची 'पायवाट' म्हणजेच महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान साहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन स्तरावर राबविला जाणारा 'करिअर कट्टा' हा अभिनव उपक्रम होय.

एमपीएससी, यूपीएससी परीक्षांची खासगी क्लासमध्ये तयारी करणे ही विद्यार्थ्यांसाठी खर्चीक बाब आहे. शहरी भागात खासगी क्लास उपलब्ध असले तरी ग्रामीण भागात मात्र अशा सुविधा फार उपलब्ध नाहीत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी करिअर कट्टा हा उपक्रम उपयुक्त ठरत आहे. युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी ध्येयपूर्तीच्या वाटेवर ३६५ दिवस करिअर कट्टा विद्यार्थ्यांसाठी कार्यरत आहे.

महाविद्यालयीन जीवनात अध्ययनाबरोबरच करिअरचा गांभीर्यपूर्वक विचार करणारी युवा पिढी हल्ली शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातही दिसून येत आहे. करिअरचे गांभीर्य अधिक वाढविण्यात पालक व स्पर्धा परीक्षांचे खासगी क्लास चालवणारे चाणाक्ष व व्यावसायिक दृष्टिकोन असलेले, प्रशासकीय क्षेत्रात यशस्वी उमेदवारांचा कौशल्याने वापर करणारे एमपीएससी, यूपीएससी क्लासवाले महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्याचे स्वप्न दाखवतात.

### करिअर कट्टाचे उपक्रम

- आयएएस आपल्या भेटीला
- उद्योजक आपल्या भेटीला
- कौशल्य प्रशिक्षण उपक्रम
- युवा दिन
- आयाजाची कार्यशाळा

### महाविद्यालयासाठीचे उपक्रम

- मॉडेल कौशल्य विकास केंद्र
- इंक्युबेशन सेंटर
- सामंजस्य करार
- रोजगार मेळावे

### करिअर कट्टाचे दैनंदिन उपक्रम

- भारतीय संविधानाचे पारायण
- वृत्तवेध स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी
- लोकशाही निवडणुका आणि प्रशासन

## युवकांसाठी ऑनलाइन कार्यशाळा

कोविड १९ प्रभावामुळे महाविद्यालयीन विश्व ठप्प झाले होते. त्यामुळे स्वीकारलेला ऑनलाइन शिक्षणाचा प्रभाव युवापिढीवर अजूनही प्रकर्षाने जाणवत आहे. यंत्राधिष्ठित उपकरणांचा वापर कोरोना काळात मोठ्या प्रमाणात वाढला. ऑनलाइन शिक्षण काही प्रमाणात पूरक असले तरी त्यातील फोलपणा आता जाणवत आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना करिअरच्या विविध दिशा माहिती व्हाव्यात या दृष्टिकोनातून ९ ऑगस्ट २०२२ रोजी 'क्रांती दिना'चे औचित्य साधून राज्यातील ७५ हजार युवकांसाठी ऑनलाइन कार्यशाळा आयोजित केली होती.

## जीवनच बदलेल

वर्तमानात सरकारी नोकऱ्यांचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत असले तरी प्रशासकीय क्षेत्रात अधिकारी होण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या व त्यासाठी अहोरात्र परिश्रम घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढतच आहे. कोविड १९ मुळे आपल्या जगण्याचे परिप्रेक्ष्य बदलले.

## विचारांच्या कक्षा रुंदावण्याची संधी

युवा पिढीने पारंपरिकतेबरोबरच आधुनिकतेचा स्वीकार केलेला आहे. आता नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे एका वेळेस अधिक विद्याशाखांमध्ये शिक्षण घेण्याची संधी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना लाभणार आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विचारांच्या कक्षा रुंदावण्याचे व आपले 'आदर्श' तपासून पाहण्याचा कालावकाश म्हणजेच महाविद्यालयीन जीवन. त्याचा विद्यार्थ्यांनी पुरेपूर लाभ घेतला पाहिजे.



डॉ. राजेंद्र थोरात
प्र-प्राचार्य आणि करिअर मार्गदर्शक

*महाराष्ट्र राज्य उच्च  व तंत्रशिक्षण  विभाग , महाराष्ट्र  माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र  यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेला उपक्रम "करिअर कट्टा" या अंतर्गत घेण्यात आलेली महाविद्यालयीन स्पर्धा २०२२-२३ चा पारितोषिक वितरणाचा सोहळा, दि. २५/०२/२०२३ रोजी,  के. जे. सोमैया वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त), विद्या विहार, मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता.*

*पारितोषिक वितरण सोहळा मा. डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मा. प्रफुल्ल पाठक, सचिव, पॉवर सेक्टर स्किल कोन्सिल, नवी दिल्ली, मा. डॉ. नामदेव भोसले, सहसचिव, उद्योजकता व कौशल्य विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, मा. डॉ. व्ही. एन. राजशेखर पिल्ले, कुलगुरू, सोमैया विद्यापीठ, मा. लेफ्टनंट कर्नल जगविर सिंग, विश्वस्त सौमैया ट्रस्ट, मा. यशवंत शितोळे, अध्यक्ष, महिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र, राज्य समन्वयक - करिअर कट्टा, मा. डॉ. प्रज्ञा प्रभू, प्राचार्या, के. जे. सोमैया वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त), विद्या विहार, मुंबई, यांच्या उपस्थतीत पार पडला.*



**उत्कृष्ट राज्यस्तरीय जिल्हा समन्वयक - द्वितीय क्रमांक**




राज्य स्तरीय आर्थिक साक्षरता समिती - अध्यक्षपदी कार्य केल्या बद्दल विशेष सन्मान